



# गोदातीर समाचार


RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १४५ * नांदेड * सोमवार, दि. १ जून २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211




















जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# घनकचरा व्यवस्थापनातील अपयश कोणाच्या पथ्यावर?

भारतीय शहरांतील उन्हाळा आता केवळ ऋतू राहिलेला नाही, तर तो नागरिकांच्या सहनशक्तीची परीक्षा बनला आहे. रस्ते रात्री उशिरापर्यंत तापलेले राहतात, सिमेंटच्या इमारती भट्टीसारख्या उष्णता साठवून ठेवतात आणि शहरांच्या बाहेरील कचऱ्याचे डोंगर सूर्याच्या तडाख्यात धुमसत राहतात. हवामान बदल, वृक्षतोड आणि वाहनांमधून होणारे प्रदूषण यांवर चर्चा होत असली तरी शहरांना अधिक तापविणारा एक गंभीर घटक दुर्लक्षित राहतो, तो म्हणजे घनकचरा व्यवस्थापनातील अपयश. कचरा आणि वाढते तापमान यांचा संबंध अनेकांना प्रथमदर्शनी जाणवत नाही. मात्र शास्त्रज्ञ आणि नगररचनाकार आता स्पष्टपणे सांगत आहेत की, अव्यवस्थित कचरा व्यवस्थापनामुळे अर्बन हीट आयलंड अर्थात शहरातील उष्मावृद्धी प्रभाव तीव्र होतो. म्हणजेच शहरांचे तापमान आसपासच्या ग्रामीण भागापेक्षा अधिक वाढते. आता केवळ दिल्ली, मुंबई किंवा लखनौसारखे शहरच नव्हे तर मराठवाड्यातील लहान लहान शहरांमध्ये देखील प्रचंड कचरा डेपो निर्माण झाले आहेत. हे केवळ दुर्गंधीयुक्त ढिगारे नसून ते उष्णता निर्माण करणारे केंद्र बनले आहेत. कचऱ्यातील सेंद्रिय पदार्थ कुजताना मिथेन वायू निर्माण होतो. हा वायू कार्बन डायऑक्साइडपेक्षा कितीतरी पटींनी अधिक घातक हरितगृह वायू मानला जातो. अनेक वेळा कचऱ्याच्या ढिगाऱ्यांना लागणाऱ्या आगीमुळे उष्णता आणि विषारी धूर परिसरात पसरतो. प्लास्टिकचा कचरा सूर्याची उष्णता मोठ्या प्रमाणावर शोषून घेतो आणि ती परत वातावरणात सोडतो. परिणामी शहरातील तापमान आणखी वाढते. एवढेच नव्हे तर, कचऱ्यामुळे हिरवळीचे क्षेत्र नष्ट होते आणि शहरांना नैसर्गिकरीत्या थंड ठेवणारी परिसंस्था उद्ध्वस्त होते. कचऱ्याचा अप्रत्यक्ष परिणामही तितकाच धोकादायक आहे. नाल्यांमध्ये अडकलेला कचरा पावसाचे पाणी अडवतो, तलाव आणि पाणवठे नष्ट करतो. हे जलस्रोत शहरातील तापमान संतुलित ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावत असतात. कचऱ्याने भरलेल्या रस्त्यांमुळे नागरिक चालणे किंवा सायकल वापरणे टाळतात आणि वाहनांचा वापर वाढतो. त्यामुळे इंधन जळते, प्रदूषण वाढते आणि शहर अधिक तापते. आज अनेक शहरे अक्षरशः उष्णतेचे सापळे बनली आहेत. या परिस्थितीत वातानुकूलित यंत्रे किंवा उष्णतेच्या सूचना देणे पुरेसे ठरणार नाही. शहरांना खऱ्या अर्थाने थंड करायचे असेल तर कचरा व्यवस्थापनात क्रांतिकारी बदल आवश्यक आहेत. यासाठी सर्वात महत्त्वाचे पाऊल म्हणजे घराघरांत कचऱ्याचे वर्गीकरण. ओला आणि सुका कचरा वेगळा केल्यास कचरा डेपोवरील ताण मोठ्या प्रमाणावर कमी होऊ शकतो. सेंद्रिय कचऱ्याचे स्थानिक पातळीवर कंपोस्टिंग केल्यास मिथेनचे उत्सर्जन घटते. विकेंद्रित कंपोस्टिंग केंद्रांमुळे कचरा वाहतुकीवरील खर्च आणि इंधन वापरही कमी होतो. कचऱ्याचा पुनर्वापर आणि पुनर्निर्मिती हेदेखील हवामान बदलाशी लढण्याचे प्रभावी शस्त्र ठरू शकते. पुनर्वापरित प्लास्टिक, कागद किंवा धातूपासून वस्तू तयार करण्यासाठी कमी ऊर्जा लागते. त्यामुळे औद्योगिक उष्णता आणि कार्बन उत्सर्जन दोन्ही कमी होतात. कचऱ्यापासून संसाधन ही संकल्पना आता पर्यावरण रक्षणाची गरज बनली आहे. याच दिशेने काही संस्था प्रभावी काम करत आहेत. कचऱ्याकडे केवळ महापालिकेची जबाबदारी म्हणून न पाहता, तो सामाजिक आणि पर्यावरणीय प्रश्न म्हणून हाताळण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली आहे. दुर्दैव असे की, एकीकडे नागरिक जागतिक तापमानवाढीबद्दल चिंता व्यक्त करतात, तर दुसरीकडे घरातील सर्व प्रकारचा कचरा एकाच डब्यात टाकून भविष्यातील पर्यावरणीय संकटाला खतपाणी घालतात. एवढेच नव्हे तर अतिसुज्ञ नागरिक आपल्या घरातला कचरा घंटागाडीमध्ये न टाकता रस्त्यावर टाकून आपला पुरुषार्थ दाखवितात. अशांवर कोणतीही कारवाई झाल्याचे ऐकिवात नाही आणि जोपर्यंत कायद्याचा बडगा कोणी उचलत नाही तोपर्यंत असे लोक वठणीवर येत नाहीत. हवामान बदलाचा मुकाबला करण्यासाठी केवळ मोठ्या आंतरराष्ट्रीय परिषदांची नव्हे, तर स्वच्छ रस्ते, हिरवळीचे संवर्धन, स्थानिक कचरा प्रक्रिया आणि जबाबदार नागरी जीवनशैलीची आवश्यकता आहे. कारण आजच्या काळात कचरा हा फक्त स्वच्छतेचा प्रश्न राहिलेला नाही; तो शहरांच्या भवितव्याचा, पर्यावरणाच्या अस्तित्वाचा आणि मानवी आरोग्याच्या सुरक्षेचा प्रश्न बनला आहे.

# पालक : जीवनाचे पहिले विद्यापीठ



दरवर्षी १ जून हा दिवस संपूर्ण जगात 'जागतिक पालक दिन' म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्र संघाने २०१२ मध्ये या दिवसाला अधिकृत मान्यता देत जगभरातील पालकांच्या योगदानाचा गौरव करण्याचा निर्णय घेतला. या दिवसामागील मूलभूत उद्देश म्हणजे पालकांनी आपल्या मुलांच्या संगोपनासाठी, शिक्षणासाठी, संरक्षणासाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी केलेल्या निःस्वार्थ त्यागाचे स्मरण करणे होय. मानवी जीवनाच्या जडणघडणीत पालकांची भूमिका इतकी महत्त्वपूर्ण असते की त्याशिवाय कोणत्याही व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाची कल्पनाही करता येत नाही. व्यक्तीच्या जन्मापासून ते तिच्या आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत पालकांचे प्रेम, मार्गदर्शन, त्याग आणि प्रेरणा तिच्यासोबत असते. त्यामुळेच पालक हे केवळ जन्मदाते नसून जीवनाचे शिल्पकार, संस्कारांचे निर्माते आणि व्यक्तिमत्त्वाचे खरे घडवणारे असतात.

मानवी समाजात कुटुंब ही सर्वांत प्राचीन आणि महत्त्वाची सामाजिक संस्था मानली जाते. या संस्थेच्या केंद्रस्थानी पालक असतात. कुटुंबातील आई-वडील हे मुलांच्या जीवनातील पहिले शिक्षक, पहिले मार्गदर्शक आणि पहिले आदर्श असतात. बालक जेव्हा या जगात येते तेव्हा त्याला कोणतीही भाषा, ज्ञान किंवा सामाजिक नियम माहिती नसतात. हळूहळू तो आपल्या पालकांकडून बोलणे, चालणे, विचार करणे, वागणे आणि समाजाशी जुळवून घेणे शिकत असतो. मुलांच्या जीवनातील पहिली शाळा म्हणजे त्यांचे घर आणि पहिले शिक्षक म्हणजे त्यांचे पालक. त्यामुळे मुलांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत पालकांची भूमिका अत्यंत मूलभूत आणि निर्णायक असते.

भारतीय संस्कृतीमध्ये पालकांना देवतुल्य स्थान देण्यात आले आहे. आईला प्रथम गुरु मानले जाते, कारण बालकाच्या जीवनातील पहिला संस्कार तिच्याकडूनच होतो. आईच्या मायेचा स्पर्श, तिचे वात्सल्य, तिची ममता आणि तिचा त्याग हे शब्दांत व्यक्त करणे अशक्य आहे. मूल नऊ महिने आपल्या उदरात वाढविण्यापासून ते त्याच्या प्रत्येक गरजेची पूर्तता करण्यापर्यंत आई अनेक संकटांचा सामना करत असते. दुसरीकडे वडील हे कुटुंबाचा आधारस्तंभ असतात. कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ते आयुष्यभर परिश्रम घेतात. मुलांच्या शिक्षणासाठी, आरोग्यासाठी आणि भविष्याच्या सुरक्षिततेसाठी ते सतत झटत असतात. आई आणि वडील या दोघांच्या प्रेम, त्याग आणि समर्पणामुळेच मुलांचे जीवन घडत असते.

पालकत्व ही केवळ जैविक जबाबदारी नसून ती एक सामाजिक, नैतिक आणि भावनिक बांधिलकी आहे. मूल जन्माला घालणे सोपे असले तरी त्याला योग्य प्रकारे वाढविणे, संस्कार देणे आणि सक्षम नागरिक बनविणे हे मोठे आव्हान असते. पालक आपल्या मुलांसाठी अनेक स्वप्ने पाहतात आणि ती पूर्ण करण्यासाठी आयुष्यभर मेहनत घेतात. अनेक वेळा स्वतःच्या इच्छा, आकांक्षा आणि सुखसोयींचा त्याग करून ते आपल्या मुलांच्या भविष्यासाठी संघर्ष करत असतात. मुलांचे यश पाहून त्यांना मिळणारा आनंद हा त्यांच्या आयुष्यातील सर्वांत मोठा पुरस्कार असतो. म्हणूनच पालकांचे प्रेम हे निःस्वार्थ, निरपेक्ष आणि शाश्वत मानले जाते.

मुलांच्या मानसिक आरोग्याच्या दृष्टीने पालकांची भूमिका विशेष महत्त्वाची ठरते. वाढती स्पर्धा, शैक्षणिक ताण, सामाजिक दबाव आणि डिजिटल माध्यमांचा प्रभाव यामुळे अनेक मुले मानसिक तणावाचा सामना करत आहेत. काही वेळा नैराश्य, चिंता, एकाकीपणा आणि आत्मविश्वासाचा अभाव यांसारख्या समस्या निर्माण होतात. अशा परिस्थितीत पालकांनी मुलांचे मित्र बनून त्यांना भावनिक आधार देणे आवश्यक असते. मुलांच्या भावना समजून घेणे, त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करणे हे सुदृढ पालकत्वाचे लक्षण आहे. प्रेम आणि विश्वास यांच्या आधारे निर्माण झालेले नाते मुलांच्या मानसिक आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते.

शिक्षण क्षेत्रात पालकांचे योगदान अनन्यसाधारण आहे. शाळा, महाविद्यालये आणि शिक्षक ज्ञान देतात; परंतु शिक्षणाविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याचे कार्य पालक करतात. मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, अभ्यासासाठी अनुकूल वातावरण उपलब्ध करून देणे आणि जिज्ञासू वृत्तीला प्रोत्साहन देणे हे पालकांचे महत्त्वाचे कार्य आहे. संशोधनातून असे दिसून आले आहे की ज्या मुलांच्या शिक्षणात पालकांचा सक्रिय सहभाग असतो, त्या मुलांची शैक्षणिक प्रगती अधिक चांगली होते. त्यामुळे शिक्षण प्रक्रियेत पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

भारतीय समाजात कुटुंबव्यवस्थेला विशेष महत्त्व आहे. पूर्वी संयुक्त कुटुंब पद्धतीमुळे मुलांच्या संगोपनात आजी-आजोबा, काका-काकू आणि इतर नातेवाईकांचा सहभाग असायचा. या वातावरणात मुलांना विविध अनुभव आणि संस्कार मिळत असत. परंतु शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि स्थलांतरामुळे विभक्त कुटुंब पद्धती वाढत आहे. परिणामी पालकांवर मुलांच्या संगोपनाची संपूर्ण जबाबदारी येत आहे. या बदलत्या परिस्थितीत पालकांनी मुलांना कौटुंबिक मूल्यांची जाणीव करून देणे आणि नातेसंबंधांचे महत्त्व समजावून सांगणे आवश्यक झाले आहे.

मुलांच्या चारित्र्यनिर्मितीत पालकांचे योगदान अमूल्य आहे. समाजात वाढत असलेली हिंसा, भ्रष्टाचार, असहिष्णुता आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास लक्षात घेता मुलांमध्ये चांगल्या संस्कारांची रुजवात करणे अत्यंत आवश्यक आहे. सत्य, अहिंसा, प्रामाणिकपणा, परिश्रम, सहकार्य आणि मानवता यांसारख्या मूल्यांची शिकवण घरातूनच मिळाली पाहिजे. पालक स्वतःच्या आचरणातून मुलांसाठी आदर्श निर्माण करतात. मुलांना उपदेशापेक्षा उदाहरणांचा अधिक प्रभाव पडतो. त्यामुळे पालकांचे वर्तन आणि जीवनशैली मुलांच्या व्यक्तिमत्त्वावर थेट परिणाम घडवितात.

कामकाजी पालकांची संख्या वाढत असताना पालकत्वाची आव्हानेही बदलत आहेत. अनेक माता आणि पिता नोकरी, व्यवसाय आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न करतात. आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी दोघांनाही काम करावे लागते. अशा वेळी मुलांना पुरेसा वेळ देणे कठीण होते. परंतु मुलांसाठी केवळ आर्थिक सुविधा पुरेशा नसतात. त्यांना प्रेम, सहवास, संवाद आणि भावनिक आधाराचीही गरज असते. त्यामुळे पालकांनी आपल्या व्यस्त जीवनातून मुलांसाठी दर्जेदार वेळ काढणे आवश्यक आहे.

विशेष गरजा असलेल्या मुलांच्या संगोपनात पालकांचे योगदान विशेष गौरवास्पद असते. अशा मुलांच्या विकासासाठी अधिक संयम, वेळ आणि समर्पण आवश्यक असते. अनेक पालक सामाजिक आणि आर्थिक अडचणींवर मात करून आपल्या मुलांना शिक्षण, उपचार आणि स्वावलंबनाच्या संधी उपलब्ध करून देतात. त्यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे. अशा पालकांचा सन्मान आणि त्यांना आवश्यक ते सहकार्य करणे ही समाजाची जबाबदारी आहे.

पालक आणि मुलांमधील संवाद हा सुदृढ नात्याचा पाया आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे आणि तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे अनेकदा संवादात अंतर निर्माण होते. परिणामी गैरसमज आणि भावनिक दुरावा वाढू शकतो. या समस्येवर मात करण्यासाठी पालकांनी मुलांशी मोकळेपणाने संवाद साधणे आवश्यक आहे. मुलांच्या विचारांचा आदर करणे, त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देणे आणि त्यांच्या भावनांना महत्त्व देणे यामुळे विश्वासाचे नाते निर्माण होते. असे नाते मुलांच्या आत्मविश्वास आणि भावनिक विकासासाठी उपयुक्त ठरते.

वृद्धापकाळातील पालकांची काळजी घेणे हे प्रत्येक व्यक्तीचे नैतिक कर्तव्य आहे. बालपणी ज्यांनी आपल्या मुलांसाठी अथक परिश्रम घेतले, त्यांना वृद्धावस्थेत प्रेम, आदर आणि आधार मिळणे आवश्यक आहे. परंतु आधुनिक जीवनशैलीमुळे अनेक वृद्ध पालक एकाकीपणाचा सामना करताना दिसतात. काही वेळा त्यांना दुर्लक्षित केले जाते किंवा वृद्धाश्रमांचा आधार घ्यावा लागतो. ही स्थिती चिंताजनक आहे. पालकांचा सन्मान करणे, त्यांच्यासोबत वेळ घालविणे आणि त्यांच्या गरजांची काळजी घेणे हे केवळ कर्तव्य नाही तर संस्कारांचे प्रतीक आहे.

जागतिक पालक दिन हा केवळ उत्सव साजरा करण्याचा दिवस नाही; तो आत्मपरीक्षण करण्याचा दिवस आहे. पालकांच्या योगदानाची जाणीव करून घेणे, त्यांच्या त्यागाचे स्मरण करणे आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हा या दिवसाचा खरा उद्देश आहे. आपल्या जीवनातील प्रत्येक यशामागे पालकांचे मार्गदर्शन, प्रेरणा आणि आशीर्वाद असतात. त्यामुळे त्यांच्या योगदानाची कदर करणे आवश्यक आहे.

राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. उद्याचे नागरिक आजच्या घरांमध्ये घडत असतात. मुलांमध्ये देशप्रेम, सामाजिक जबाबदारी, लोकशाही मूल्ये आणि मानवतेची भावना रुजविण्याचे कार्य पालक करतात. सक्षम, सुसंस्कृत आणि जबाबदार नागरिक घडविणारे पालक हे खऱ्या अर्थाने राष्ट्राचे शिल्पकार असतात. समाजाचा विकास, राष्ट्रीय प्रगती आणि मानवी मूल्यांचे संवर्धन यामागे पालकांचे अप्रत्यक्ष परंतु प्रभावी योगदान असते.

आजच्या बदलत्या काळात पालकत्वाचे स्वरूप बदलत असले तरी त्याची मूलभूत मूल्ये कायम आहेत. प्रेम, त्याग, समर्पण, जबाबदारी, संरक्षण आणि संस्कार ही पालकत्वाची शाश्वत वैशिष्ट्ये आहेत. मुलांच्या आनंदात आनंद मानणारे, त्यांच्या यशासाठी स्वतःचे सुख बाजूला ठेवणारे आणि त्यांच्या भविष्यासाठी आयुष्यभर झटणारे पालक हे समाजाचे खरे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या निःस्वार्थ प्रेमामुळेच मानवी जीवन अधिक सुंदर, सुरक्षित आणि अर्थपूर्ण बनते.

जागतिक पालक दिनाच्या निमित्ताने आपण प्रत्येकाने आपल्या पालकांविषयी आदर, प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. त्यांना वेळ देणे, त्यांचे विचार ऐकून घेणे, त्यांच्या त्यागाची जाणीव ठेवणे आणि त्यांच्या सन्मानाचे रक्षण करणे हीच त्यांच्याप्रती खरी कृतज्ञता ठरेल. पालकांचा सन्मान जिथे केला जातो, तिथे संस्कार, मूल्ये आणि मानवता जिवंत राहतात. सुदृढ कुटुंब, सुसंस्कृत समाज आणि समृद्ध राष्ट्रनिर्मितीसाठी पालकांचे योगदान अनमोल आहे. म्हणूनच १ जूनचा जागतिक पालक दिन हा केवळ दिनविशेष नसून प्रेम, कृतज्ञता, संस्कार आणि मानवी नात्यांच्या अमूल्यतेची जाणीव करून देणारा प्रेरणादायी दिवस आहे. पालकांचे ऋण कधीही फेडता येत नसले तरी त्यांच्या त्यागाचा सन्मान करून, त्यांच्या मूल्यांचा वारसा जपून आणि त्यांच्या प्रेमाची कदर करून आपण त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करू शकतो. हाच जागतिक पालक दिनाचा खरा संदेश आणि सार आहे.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
हिंगोली

# नांदेड उत्तरचे विकासाभिमुख नेतृत्व आ. बालाजीराव कल्याणकर

१ जून हा दिवस नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघासाठी विशेष महत्त्वाचा आहे. कारण या दिवशी जनतेच्या विकासासाठी स्वतःला समर्पित करणारे, सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देणारे आणि विकासाला नवे आयाम देणारे आमदार बालाजीराव कल्याणकर यांचा वाढदिवस. जनतेच्या मनात त्यांनी केवळ लोकप्रतिनिधी म्हणून नव्हे, तर विकास पुरुष म्हणून आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. त्यामुळे जनतेने त्यांना दुसऱ्यांदा विधानसभेत आमदार म्हणून निवडून दिले आहे.

राजकारणात येण्यामागे सत्ता नव्हे तर समाजसेवा हे ध्येय ठेवून बालाजीराव कल्याणकर यांनी आपल्या कार्याची सुरुवात केली. मतदारसंघातील प्रत्येक नागरिकाच्या समस्या समजून घेत त्या सोडविण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. याच जनाभिमुख कार्यशैलीमुळे आज नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाच्या विकासाची चर्चा झाली की, त्यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.



नांदेड उत्तर मतदारसंघातील आरोग्य क्षेत्रात मोठी झेप घेण्याचे काम त्यांनी केले. वाडी बुद्रुक येथे उपजिल्हा रुग्णालयाची उभारणी करून ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय त्यांनी साकार केला. या रुग्णालयामुळे हजारो नागरिकांना उपचारासाठी दूरवर जाण्याची गरज कमी झाली आहे.

शिक्षण आणि कृषी विकासालाही त्यांनी प्राधान्य दिले. नांदेड येथे कृषी महाविद्यालय मंजूर करून ग्रामीण आणि शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाची नवी दारे खुली केली. या महाविद्यालयामुळे कृषी क्षेत्रातील आधुनिक ज्ञान आणि संशोधनाचा लाभ स्थानिक युवकांना मिळणार आहे. वाहतूक आणि दळणवळणाच्या दृष्टीने नांदेड उत्तर बाह्य वळण रस्ता हा त्यांच्या दूरदृष्टीचा महत्त्वपूर्ण प्रकल्प ठरला आहे. या रस्त्यामुळे शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होत असून, विकासाला गती मिळत आहे. ग्रामीण भागातील अनेक रस्त्यांचे जाळे मजबूत करून त्यांनी गावागावांना विकासाच्या मुख्य प्रवाहाशी जोडण्याचे काम केले आहे.

नांदेड शहरातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला इनामी जमिनीचा प्रश्न सोडविण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या प्रश्नामुळे हजारो नागरिकांना मालकी हक्क आणि विकासकामांमध्ये येणाऱ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा गुंतागुंतीचा प्रश्न मार्गी लागला आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळाला.

नागरी सुविधांच्या विकासासाठीही त्यांनी विशेष लक्ष दिले.शहरातील व्यवस्था सुधारण्यासाठी तसेच पाणीपुरवठा योजनांच्या बळकटी-करणासाठी विविध विकासकामे राबविली. यामुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अनेक समस्या दूर होण्यास मदत झाली. मूलभूत सुविधांचा दर्जा उंचावणे हेच खऱ्या विकासाचे मापदंड असल्याचा त्यांचा विश्वास आहे. सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. लोकमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याचा गौरव व्हावा आणि भावी पिढ्यांना प्रेरणा मिळावी यासाठी त्यांच्या पुतळ्याची उभारणी करण्यात त्यांनी पुढाकार घेतला. इतिहास, संस्कृती आणि सामाजिक मूल्यांचे जतन करण्याची त्यांची भूमिका यामधून स्पष्ट होते.

आ. बालाजीराव कल्याणकर यांची ओळख केवळ विकासकामांपुरती मर्यादित नाही. जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होणारा, प्रत्येक घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न करणारा आणि सर्वांना सोबत घेऊन विकासाची वाटचाल करणारा नेता म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. त्यांच्या नेतृत्वामुळे नांदेड उत्तर मतदारसंघात विकासाची नवी दिशा निर्माण झाली आहे. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील नागरिक कृतज्ञतेने त्यांच्याकडे पाहत आहेत. आरोग्य, शिक्षण, रस्ते, पाणी, ड्रेनेज, कृषी विकास आणि सामाजिक प्रश्न सोडविण्याच्या त्यांच्या कार्यामुळे मतदारसंघाच्या विकासाला नवी ओळख मिळाली आहे.

विकासाचा ध्यास, जनतेप्रती असलेली बांधीलकी आणि प्रगतीसाठीची अथक धडपड यामुळेच आमदार बालाजीराव कल्याणकर हे नांदेड उत्तरचे विकास पुरुष म्हणून ओळखले जातात. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांना निरोगी, दीर्घायुषी आणि यशस्वी जीवन लाभो, हीच जनतेची सदिच्छा.

**-नारायण कदम**
जिल्हाध्यक्ष नांदेड
सरपंच परिषद, मुंबई

# समाज जाणिवा जाणणारा भला माणूस : किशोर भवरे

बाळाचे पाय पाळण्यात दिसतात, अशी एक लोकोक्ती सर्वत्र रूढ झालेली आहे. त्या अनुषंगाने विचार करता त्या कक्षेत बसणाऱ्या काही भल्या माणसांची सुसंगती सजग होते. आठवणींना मग उजाळा मिळतो. आवर्जून दखल घेणे अपरिहार्य होते तेव्हा एकच नाव तरळतं...किशोर दामोदर भवरे!



१ जून १९५८ रोजी त्यांच्या आजोळी मौजे सावळेश्वर ता. उमरखेड जि. यवतमाळ इथे झाला. तसे पाहिले तर त्यांच्या वडिलांचे मूळ गाव मौजे अंभोडा ता. महागाव जि. यवतमाळ आणि त्यांची सासुरवाडीही यवतमाळ. डी. एच. एम. एस. अशी शैक्षणिक पात्रता प्राप्त केल्याच्यानंतर ते नांदेडला कैलासनगर येथे स्थायिक झाले. १९९२ साली नांदेड नगरपालिकेवर नगरसेवक म्हणून प्रचंड बहुमतांनी निवडून आले. नांदेड नगरपालिका उपनगराध्यक्षपदी १९९३ साली त्यांची निवड झाली.

मराठवाड्याचे भगीरथ कै. शंकरराव चव्हाण ते माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली एक समाजसेवी व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची जडणघडण झाली. नांदेड नगरपालिकेत उपनगराध्यक्ष असताना त्यांनी मूलभूत गरजांच्या परिपूर्तेसाठी अत्यावश्यक कामे केली. महत्त्वाची ड्रेनेज लाईन आणि नळ जोडणी ह्या कामांना प्राधान्य दिले. मुख्य रस्त्यांसह प्रत्येक वॉर्डातील अंतर्गत रस्त्यांचे काम केले. रस्त्यांचे सिमेंट, नाले सफाई, कचरा व्यवस्थापन अशी महत्त्वपूर्ण कामे केली. बौद्ध धम्म अभ्यासासाठी त्यांनी श्रीलंकेचा दौरा केला. मग उमरखेड मतदारसंघातील प्रत्येक पंचशील ध्वज आणि बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे मोफत वाटप केले. त्याखेरीज अनाथाश्रमात अन्नदान, भूकंपग्रस्तांना भोजनाची व्यवस्था, सामूहिक विवाह मेळाव्यांचे आयोजन, मंगळसूत्र वाटप, आदिवासी दंडार नृत्य कलेला प्रोत्साहन, आदिवासी पाड्यात हायड्रोलिक (हँडपंप) कूपनलिका आणि गोर माटी बंजारा भजनी मंडळांना चालना देण्यासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडली.

किशोर भवरे यांच्या सुविद्य पत्नी शीला भवरे ह्या २०१७ साली मागासवर्गीय पहिल्या नांदेड वाघाळा महानगरपालिकेच्या महापौर बनल्या. त्याच कालखंडात नरेंद्र मोदी यांचा नांदेड विमानतळावर सत्कार घडवून आणला. गणेश नगर प्रभाग सहामधून त्या प्रचंड बहुमताने निवडून आल्या. छत्रपती शाहू महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा, आय.टी.आय चौकात क्रांतीबा फुले - सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांची उभारणी करून त्यांनी केलेल्या ऐतिहासिक कृत्यांची सचित्र उभारून चिरंतन असे स्मारक निर्माण केले. म्हणजे भवरे दांपत्यांनी नांदेडच्या सांस्कृतिक कार्याला गतिमान करण्यासाठी निरपेक्ष भावनेने जे भरीव योगदान दिले ते अविस्मरणीय स्वरूपाचे आहे हे अधोरेखित करावेच लागते.

गेल्या दशकातील महा-परिवर्तनाचा कालखंड म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची हिंदुस्थानच्या पंतप्रधान पदी झालेली निवड. भव्य दिव्य संरचनात्मक विकासाची पायाभरणी ही सृष्टी हाच त्याचा मूलाधार. पश्चिम बंगालमध्ये नव्याने सत्ता स्थापन हे यशाचे यशोशिखर हे त्याचे ताजे उदाहरण. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची धडाडीची कार्यशैली पाहून संपूर्ण हिंदुस्थानातील राजकारणाला नवी कलाटणी मिळाली. अनेक दिग्गज नेते आपापला पूर्वापार पक्ष सोडून भाजपमध्ये विलीन झाले.

राजकारणाची समीकरणे पूर्णतः बदलली आणि एका नव्या विकास पर्वाचा प्रारंभ झाला. बदलत्या वाऱ्याचा वेध घेत घेत जे बोध घेतात त्यांनाच नवदिशा सापडतात. भवरे कुटुंबियांनी खा. अशोकराव चव्हाण यांचा आदर्श नजरेसमोर ठेवून भाजपाच्या दिंडीत ते समाविष्ट झाले. पक्ष कुठलाही असो, पण लोकहिताची जिथे जोपासना केली जाते त्याची बांधिलकी महत्त्वाची असते ही जाण किशोर भवरे यांना असल्यामुळेच ते प्रयोगशील समाजसेवक म्हणून परिचित झाले आहेत. १ जून हा त्यांचा वाढदिवस. त्यांना उदंड अन् निरामय आरोग्य लाभो ह्याच सम्यक शुभेच्छा..!

**-प्रा. रविचंद्र हडसनकर,**
नांदेड

# लालपरीला वाढदिवसाच्या शुभेच्छा!

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या एसटीचा आज म्हणजे १ जूनला ७८ वा वाढदिवस. १ जून १९४८ रोजी पुणे-नगर या मार्गावर पहिली एसटी धावली होती. आज एसटी महामंडळाचा विस्तार झाला आहे. गाव तेथे एसटी, रस्ता तिथे एसटी या ब्रीदवाक्यानुसार एसटीचा विस्तार होत गेला. गावागावांत आज एसटी पोहचली आहे. एकूण ३१ विभागांतून एसटीचे कामकाज केले जाते. त्याचप्रमाणे आंतरराज्यीय सेवा देखील पुरवली जातेय. कर्नाटक, गोवा, आंध्रप्रदेश, तेलंगणा, गुजरात, मध्यप्रदेश या राज्यात आज एसटी पोहचली आहे.

राज्यातील कोट्यवधी प्रवाशांच्या लाडक्या लालपरीने काळानुसार कात टाकली असून, अनेक बदलही केले आहेत. लालपरीपासून हिरकणी, शिवनेरी, शिवशाही आता विठाई असा एसटीचा चेहरामोहरा बदलत गेला आहे. एसटी म्हणजे केवळ प्रवाशांची वाहतूक एव्हढेच मर्यादित नसून एसटीने सातत्याने सामाजिक बांधिलकी जपली आहे. राज्यावर आलेल्या भूकंप, दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीत एसटीने नेहमीच मदतीचा हात पुढे केला आहे.

मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात राहता यावे यासाठी एसटीने पुढाकार घेत प्रवासात सवलती दिल्या आहेत. खेड्यापासून शाळा कॉलेजमध्ये जाण्यासाठी विद्यार्थ्यांचे हक्काचे वाहन म्हणजे एसटीच. ग्रामीण भागातील करोडो विद्यार्थ्यांचे शिक्षण केवळ एसटीमुळेच पूर्ण होऊ शकले. म्हणूनच राज्यातील करोडो प्रवाशांच्या मनात एसटी विषयी आदराची भावना आहे. एसटी म्हणजे ग्रामीण भागासाठी वरदानच आहे. ग्रामीण भागात आजही एसटी हेच दळणवळणाचे प्रमुख साधन आहे. जनतेचा प्रवास सुखकर व्हावा, प्रवाशांना तत्पर आणि वक्तशीर सेवा मिळावी यासाठी एसटीचे कर्मचारी झटत असतात पण गेल्या काही वर्षांपासून एसटी महामंडळ तोट्यात असल्याने एसटी कर्मचाऱ्यांचे भवितव्य अंधकारात बुडाले आहे.

सरकारनेही एसटीकडे आपुलकीने पाहिल्यास एसटीला पुन्हा गतवैभव प्राप्त होईल. राज्यातील प्रवाशांच्या मनात मानाचे स्थान असलेल्या आणि सर्वांच्या लाडक्या लालपरीला म्हणजेच एसटीला ७८ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# तोटावाड नर्सिंग हॉस्पिटलला बांधकाम परवानगीच नाही!

## माहिती अधिकारात झाले उघड

**नांदेड (प्रतिनिधी)**–शहरात मोठ्या प्रमाणात टोलेजंग इमारती बांधून रुग्णालय सुरू करण्यात आले आहेत. परंतु यापैकी बहुतांश रुग्णालयांच्या इमारतींना परवानगी नसल्याचे उघड होत आहे. आता कौठा येथील तोटावाड नर्सिंग हॉस्पिटलला बांधकाम परवानगी नसल्याचे सचिन पाटील यांनी माहिती अधिकारातून उघड केले आहे.

शहरातील कौठा येथील विजयनगर हाऊसिंग सोसायटीमध्ये तोटावाड नर्सिंग हॉस्पिटल नावाने रुग्णालय सुरू करण्यात आले असून, या रुग्णालयाच्या बांधकाम परवानगीबाबतची माहिती शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख सचिन पाटील यांनी माहिती अधिकारात मागवली होती. या पत्राला उत्तर देत महापालिकेच्या नगररचना विभागाने तोटावाड नर्सिंग हॉस्पिटलची बांधकाम परवानगी आढळून आली नसल्याचे नमूद केले आहे. अभिलेख संचिका, दिनांक किंवा परवाना क्रमांक नोंदविल्यास माहिती देणे सोयीचे होईल असे सांगत टाळाटाळ केली आहे. त्यामुळे तोटावाड नर्सिंग हॉस्पिटलला बांधकाम परवानगी नसल्याचे सिद्ध झाले असून, महापालिका यावर आता काय कारवाई करेल याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.



# नांदेडमध्ये मान्सूनपूर्व पावसाची हजेरी; शहरासह जिल्ह्यात काही ठिकाणी जोरदार पाऊस

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहर आणि जिल्ह्यात मागील आठ दिवसांपासून तापमानात प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढ झाली होती. रविवारी दुपारी साडेचारच्या सुमारास अचानक ढग भरून आले आणि वेगाच्या वादळीवाऱ्यासह पावसाचे आगमन झाले. अचानक आलेल्या पावसामुळे जनजीवन चांगलेच विस्कळीत झाले होते. मान्सूनपूर्व पावसाच्या आगमनाने शेतकऱ्यांच्या पेरणीपूर्व मशागतीच्या कामात अडथळा निर्माण झाला.



नांदेड शहर व जिल्ह्यात रविवारी दुपारी जोरदार वादळी वाऱ्यासह पावसाचे आगमन झाले. वाढत्या तापमानामुळे नांदेडकरांची उकाड्यापासून काहीअंशी सुटका झाली, मात्र परत पाऊस उघडल्याने नांदेडकर घामाघुम झाले. दुपारी आलेल्या अचानक पावसामुळे शेतावर पेरणीपूर्व मशागतीच्या कामासाठी गेलेले शेतकरी, बाजारपेठेत आलेले शेतकरी, ग्राहक यांची मात्र चांगलीच धांदल उडाली. शहराच्या नवीन मोंढा व जुना मोंढा भागात व्यापाऱ्यांनी दुकानाबाहेर ठेवलेली हळद, भुईमूग शेंगा या सोबतच अन्य पिकांची झाकाझाकी करण्यामध्ये व्यापारी त्रस्त झाले.

जिल्ह्यातील अर्धापूर, बारड, मुदखेड या भागात जोरदार वाऱ्यामुळे केळी पिकाचे मोठे नुकसान झाले. दुपारनंतर तापमानात कमालीची घट झाल्याने नांदेडकरांना चांगला गर्मीपासून दिलासा मिळाला. १ जून व २ जून रोजी हवामान खात्याने येलो अलर्ट जारी केला आहे.

# अर्धापूर तालुक्यात वादळी वाऱ्यासह पावसाची हजेरी

- नांदाला-दिग्रस परिसरात गारांचा तडाखा
- शहरात पिंपळाचे झाड कोसळल्याने मोठ्या अनर्थ टळला

**अर्धापूर (प्रतिनिधी)** – तालुक्यात रविवार, दि. ३१ मे रोजी दुपारी अचानक हवामानात मोठा बदल झाला आणि वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाला सुरुवात झाली.

अर्धापूर शहरातील हनुमान मंदिराजवळील जुने पिंपळाचे मोठे झाड मोटारसायकल, दुकानावर कोसळल्यामुळे प्रचंड नुकसान झाले, परंतु मोठा अनर्थ टळला. तसेच तालुक्यातील नांदाला-दिग्रस यासह अनेक गावांत काही वेळ चक्क गारांचा पाऊस पडला. अचानक आलेल्या या वादळी-वारे व पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. वादळी वारे आणि गारांच्या पावसामुळे तालुक्यातील केळी बागांचे आणि इतर शेती पिकांचे मोठे नुकसान झाल्याने शेतकरी पुन्हा एकदा चिंतेत पडला आहे.



# बिलोली व कुंटूर पोलिसांची अवैध वाळू वाहतुकीविरुद्ध कारवाई; ७६ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध वाळू वाहतुकीला आळा घालण्यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी, बिलोली व कुंटूर पोलीस स्टेशनच्या संयुक्त पथकाने कारवाई केली. या कारवाईत तब्बल ७६ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

३१ मे रोजी पहाटे दीडच्या सुमारास नायगाव तालुक्यातील आंतरगाव शिवारातील गोदावरी नदीपात्राजवळ छापा टाकण्यात आला. या कारवाईदरम्यान नदीपात्रातून अवैधरित्या वाळू उपसा सुरू असल्याचे आढळून आले. छाप्यात एक हायवा, दोन ट्रॅक्टर-ट्रॉली, एक जेसीबी, दोन मोटारसायकली तसेच सहा ब्रास वाळू असा एकूण ७६ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



या प्रकरणी कुंटूर पोलीस ठाण्यात संजय नागेश हंबर्डे (वय २०), गोपीनाथ बालाजी हंबर्डे (वय ३०) रा. धनज ता. नायगाव, गोविंद तुळशीराम शिंदे (वय ३०), गोविंद सखाराव शिंदे (वय ३०), मोहन सखाराव शिंदे (वय ३८), विश्वंभर नागोराव शिंदे (वय ४२) रा. अंतरगाव ता. नायगाव, पांडुरंग हणमंत इबीतवार, बळवंत गोविंद शिंदे, भिवाजी सीताराम तोडे, गजानन भाऊराव तोडे, शंकर बाबाराव शिंदे अशा ९ जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३० (२) व ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दहा जणांविरुद्ध कारवाई करण्यात आली असून, तपास पोलीस उपनिरीक्षक कारामुंगे करत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी श्याम पानेगावकर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस निरीक्षक अ. रां. घोडके, पोलीस उपनिरीक्षक मलिकार्जून कारामुंगे, गजा तोटेवाड, पोलीस अंमलदार आदींनी केली.

## नांदेड ग्रामीण पोलिसांचीही कारवाई; ५२ लाखांची यंत्रसामुग्री जप्त

येथील अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी (इतवारा) प्रशांत शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोलीस उपनिरीक्षक व्यंकट कुसमे, पोलीस अंमलदार वसंत केंद्रे, धम्मपाल कांबळे, सचिन चावरे, शंकर माळगे यांनी सहभाग घेतला. या कार्यवाहीत नदीतून वाळू उपसा करणारे ५ इंजिन, ३० तराफे, ३० ब्रास वाळू आणि फायबरची एक मोठी बोट असा ५१ लाख ७५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. काही साहित्य तेथेच जाळून टाकण्यात आले आहे. याप्रकरणी दोन अज्ञात आरोपीतांविरुद्ध दाखल करण्यात आला आहे.

# पीपल्स कॉलेजच्या प्राचार्यपदी डॉ. विकास सुकाळे यांची नियुक्ती

**नांदेड (प्रतिनिधी)** –परमपूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांनी स्थापन केलेल्या नांदेड एज्युकेशन सोसायटी संचालित पीपल्स कॉलेज, नांदेड येथील प्राचार्य पदाचा पदग्रहण सोहळा महाविद्यालयाच्या आय.सी.टी. हॉलमध्ये शुक्रवारी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी नवनियुक्त प्राचार्य डॉ. विकास सुकाळे यांनी सर्वांच्या उपस्थितीत प्राचार्य पदाचा पदभार स्वीकारला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील होते. संस्थेच्या सचिव सौ. श्यामल पत्की, सहसचिव ॲड. प्रदीप नागापूरकर, प्रभारी प्राचार्य डॉ. शिवशंकर भानेगावकर, सौ. सुधा सुकाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोपात सीए डॉ. प्रवीण पाटील म्हणाले की, पीपल्स कॉलेजच्या प्राचार्य पदाची गौरवशाली परंपरा आहे. महाविद्यालयाच्या इतिहासात प्रथमच अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक प्राचार्यपदी विराजमान झाले आहेत. माजी अध्यक्ष डॉ. व्यंकटेश काब्दे यांनी संस्थेची ध्येय-धोरणे पुढे नेणाऱ्या व्यक्तीची निवड करण्याची जबाबदारी आमच्यावर सोपविली होती. डॉ. विकास सुकाळे यांच्या रूपाने पीपल्स कॉलेजमध्ये विकासपर्वाची सुरुवात होईल, याची खात्री आहे.



संस्था आणि प्राचार्य यांच्यातील सुसंवाद चांगला असेल तर शैक्षणिक विकास निश्चित घडतो. पीपल्स कॉलेज हे एकेकाळी सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक चळवळीचे मराठवाड्यातील केंद्र होते. त्या परंपरेला नवसंजीवनी देण्याची अपेक्षा डॉ. सुकाळे यांच्या नेतृत्वाकडून आहे. महाविद्यालयाचा विकास म्हणजे संस्थेचा विकास असून, शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्याच्या दिशेने ही विकासपर्वाची सुरूवात झाली आहे, असेही सीए डॉ. प्रवीण पाटील म्हणाले.

संस्थेच्या सचिव सौ. श्यामल पत्की यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, प्राचार्य पद हे सर्वांना सोबत घेऊन चालणारे नेतृत्वाचे पद आहे. विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, संस्थेची ध्येय-धोरणे आणि सामाजिक जबाबदारी या सर्वांचा विचार करून निर्णय घेणारी व्यक्ती प्राचार्य असावी. डॉ. सुकाळे यांच्या कार्यकाळात महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता निश्चितच अधिक उंचावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# प्लॉट बळकावण्याच्या उद्देशाने खंडणीची धमकी; गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहराच्या जुना कौठा भागात एकाने प्लॉट बळकावण्याच्या उद्देशाने अविनाश भोसीकर यांना धमकी देऊन खंडणी मागितल्याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहराच्या जुना कौठा भागात राहणारे अविनाश विश्वनाथ भोसीकर (वय ४६) यांना २८ मे रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास आरोपी सतनामसिंग मणी याने त्याच्या मोबाईलवरून अविनाश भोसीकर यांना फोनवरून जबरदस्ती प्लॉट बळकावण्याच्या उद्देशाने धमकी दिली. यात त्याने पैशाचीही मागणी केली. अविनाश भोसीकर यांच्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात आरोपी सतनामसिंग मणीविरुद्ध खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार गुट्टे करत आहेत.

### नायगाव तालुक्यातील टाकळी येथे हाणामारीची घटना

दि. २५ मे रोजी रात्री दीडच्या सुमारास टाकळी बुद्रुक तालुका नायगाव येथे बालराज शिवराम चोंडे (वय २६), रितेश अशोक चोंडे (वय २२) आणि शिवराम विश्वनाथ चोंडे (वय ५२) यांनी संगनमत करून जुन्या कारणावरून बालाजी देवराव चोंडे (वय ५५) यांना जबर मारहाण केली. यात त्यांच्या डोक्याला आणि हाताला गंभीर दुखापत झाली आहे. एवढेच नाही तर बालाजी चोंडे यांच्या पत्नीलाही लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. या प्रकरणी बालाजी चोंडे यांच्या फिर्यादीवरून रामतीर्थ पोलीस ठाण्यात वरील तीन जणांविरुद्ध गंभीर दुखापत केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक पेदे करीत आहेत.

# मुख्याध्यापक यशवंत थोरात सेवानिवृत्त



**नांदेड (प्रतिनिधी)** – श्रीनिकेतन हायस्कूल दीपकनगर तरोडा (बु.) नांदेडचे मुख्याध्यापक यशवंत लक्ष्मण थोरात हे ३१ मे रोजी आपल्या ३५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत.

आपल्या सेवाकाळात यशवंत थोरात यांनी प्रामाणिकपणे आणि कर्तव्यदक्षपणे काम करून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष दिले. त्याचवेळी शाळा व्यवस्थापनातही त्यांनी मोठी सुधारणा घडवून आणली, अशा प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केल्या.

त्यांच्या सेवानिवृत्तीबद्दल शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचा कार्यपूर्तीबद्दल गौरव केला.

# पांडुरंग गोडबोले यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** – बळीरामपूर येथील ज्येष्ठ नागरिक, ग्रामपंचायतीचे माजी सदस्य पांडुरंग उर्फ आबा किशनराव गोडबोले (वय ८०) यांचे रविवार, दि. ३१ मे रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवार, दि. १ जून रोजी दुपारी १२ वाजता बळीरामपूर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, नातू, नातवंडे असा परिवार आहे.

# राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त स्मारकस्थळी अभिवादन व अन्नदान कार्यक्रम संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)** –राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त व्हीआयपी रोड येथे उभारण्यात येत असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकाच्या बांधकामस्थळी अभिवादन व अन्नदान कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शिवसेनेचे जिल्हा संघटक नवनाथ काकडे यांच्या वतीने आयोजित अन्नदान कार्यक्रमाचे उद्घाटन नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बालाजीराव कल्याणकर व आमदार आनंदराव बोंढारकर यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी आमदार बालाजीराव कल्याणकर, आमदार आनंदराव बोंढारकर, प्रवीण पाटील चिखलीकर, शिवालय उद्योग समूहाच्या अध्यक्षा संध्याताई कल्याणकर, नगरसेविका संध्या महेंद्र देमगुंडे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गंगाधर बडुरे, सहसंपर्कप्रमुख दर्शनसिंग सिद्धू, सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष नारायण कदम, सहसंपर्कप्रमुख संतोष भारसावडे, शिवसेनेचे जिल्हा संघटक नवनाथ काकडे, सार्वजनिक जयंती मंडळाचे अध्यक्ष पंढरीनाथ जायनुरे, दीपक तुडमे, भास्कर तळणे, तालुकाप्रमुख धनंजय पावडे, उपतालुकाप्रमुख गणेश बोकारे, प्रल्हाद जोगदंड, श्याम वानखेडे, व्यंकट मोकले, सुदामराव काकडे, गजानन सरोदे, राजू वाघमारे, प्रदीप सरोदे, लोकेश सातोरे यांच्यासह असंख्य मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी, धर्मरक्षक व जनहितकारी कार्याचा आदर्श समाजासमोर ठेवत जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. अभिवादनानंतर उपस्थितांना अन्नदान करण्यात आले. कार्यक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांचे स्मरण करून त्यांच्या कार्याचा आदर्श घेण्याचे आवाहन केले.

# प्रभन्ना पाटील यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** – बिलोली तालुक्यातील आदमपूर येथील ज्येष्ठ नागरिक प्रभन्ना होटलप्पा पाटील (९१) यांचे शनिवार, दि. ३० मे रोजी रात्री ८:४० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर रविवार, दि. ३१ मे रोजी दुपारी १२ वाजता शेतमळ्यात अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात चार मुले, चार सुना, दोन मुली, दोन जावई, नातवंडे असा परिवार आहे. माणिकराव पाटील, किसनराव पाटील, राजेश पाटील, माधव पाटील यांचे ते वडील होत.

# बायोमेट्रिक यंत्राअभावी वेळेचे नियोजन कोलमडले

**नवीन नांदेड (प्रतिनिधरी)** – नांवाशमनपाच्या सिडको क्षेत्रीय कार्यालयात बायोमेट्रिक यंत्र व ऑनलाईन कक्ष नसल्याने अधिकारी व कर्मचारी कधीही या, केव्हाही जा, अशी स्थिती झाल्याने अनेक विभागातील कामे प्रलंबित आहेत. त्यामुळे नागरिकांना कामांसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. मनपा आयुक्त यांनी तत्काळ बायोमेट्रिक यंत्र व ऑनलाईन कक्ष स्थापन करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

प्रभाग क्रमांक १९ व २० प्रभागाचा समावेश आहे. एकूण मालमत्ता जवळपास ३० हजारांच्या वर असून, लोकसंख्या ६० हजार आसपास आहे. दोन्ही प्रभागातील लोकप्रतिनिधींची संख्या ९ आहे, कार्यालयात एक सहायक आयुक्त, एक वरिष्ठ लिपीक, चार लिपीक, चार कर निरीक्षक व वसुली लिपीक दहा, इतर विभागातील लिपीक तीन व सेवक चार आहेत, मात्र कार्यालयीन वेळेत सकाळी फक्त एक सेवक व मोजके कर्मचारी उपलब्ध राहत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.









**नांदेड** – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त भाजपा कार्यालयात 'मन की बात' कार्यक्रमादरम्यान माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, अमरनाथ राजूरकर, महापौर कविता मुळे, उपमहापौर दीपकसिंह रावत, प्रवीण साले, सदिच्छा सोनी पाटील, माजी महापौर जयश्री पावडे, नगरसेवक किशोर स्वामी, शिलत खांडील, मनोज भंडारी, ज्योती कल्याणकर, बाळू खोमणे, विजय येवनकर यांच्यासह नगरसेवक, पदाधिकारी उपस्थिती होते. तर दुसऱ्या छायाचित्रात प्रस्तावित स्मारकस्थळी प्रतिमेस अभिवादन करण्यासाठी आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंदराव बोंढारकर, प्रवीण पाटील चिखलीकर, सौ. संध्याताई कल्याणकर, संध्या देमगुंडे, संगिता पाटील डक, गंगाधर बडुरे, नारायण कदम, दर्शनसिंघ सिद्धू, संतोष भरसावळे, नवनाथ काकडे, पंढरीनाथ जायनुरे, महेंद्र देमगुंडे, भास्कर तळणी, धनंजय पावडे, गणेश बोकारे आदी मान्यवर उपस्थित होते. काँग्रेस कार्यालयात जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे, सुरेंद्र घोडजकर, डॉ. रेखा चव्हाण, राजेश पावडे, आनंद चव्हाण, सत्यपाल सावंत, एकनाथ मोरे, रमेश चित्ते, कुमार कुर्तडीकर, संजय वाघमारे, ललिता कुंभार, ज्योती कदम, गणेश ढगे, दीपकसिंग हुजुरीया, मुरलीधर कल्याणकर, लक्ष्मणराव सोनटक्के, देशमुख, शिवसंभो स्वामी, धनंजय उमरीकर, संदीप कदम आदीसह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. (छाया : करणसिंह बैस, नांदेड)

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com

# प्रगतीमंत्र

# प्रेमात धोका! प्रेयसीला सांगितले, 'मी एक दिवस आयएएस अधिकारी होईन!'

## जिद्दीने तिसऱ्या प्रयत्नात झाला UPSC उत्तीर्ण

**चित्रपटांमध्ये अनेकदा असे दिसून येते की प्रेमात धोका मिळाल्यानंतर एखादी व्यक्ती यश मिळवण्यासाठी दृढनिश्चय करते. पण खऱ्या आयुष्यात अशा कथा दुर्मिळ आहेत. बिहारच्या आदित्य पांडे यांची कथा अशीच आहे. प्रेयसीने धोका दिल्यानंतर त्यांनी प्रेयसीला सांगितले, की तो एक दिवस IAS अधिकारी बनेल. त्यावेळी प्रेयसीने त्याचा हा दृढनिश्चय हसण्यावर नेला. मात्र असंख्य अडथळे आणि अडचणींवर मात करून अखेरीस तिसऱ्या प्रयत्नात आदित्य यांनी UPSC परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रेयसीच्या डोळ्यांत अंजन घातले. आदित्यला गमावल्याबद्दल तिला आता पश्चाताप होत नसेल तर नवल... पण ही यशोगाथा सांगते की कसे आदित्यने दुःखाचे सामर्थ्यात रूपांतर केले आणि एक IAS अधिकारी म्हणून तो चमकला...**




पाटणा येथील आदित्यला तीन बहिणी, एक भाऊ आहे. तो कुटुंबातील सर्वात लहान आहे. तो अभ्यासापेक्षा त्याच्या खोड्यांसाठी जास्त ओळखला जात असे. त्याच्या एका शिक्षकाने त्याच्या वडिलांना गंमतीने म्हटले होते, की जर आदित्य अभ्यासात यशस्वी झाला, तर ते त्यांची मिशी काढतील. आदित्य यांनी त्यांचे सुरुवातीचे शिक्षण पाटणा येथे पूर्ण केले. नंतर ते त्यांच्या बहिणीसोबत राहण्यासाठी गुजरातमधील जामनगर येथे गेले.

» दहावीत असताना प्रेयसी, अपेक्षेप्रमाणे निकाल नाही... : जामनगरमध्ये आदित्य यांनी आठवी आणि नववीत असताना उत्कृष्ट कामगिरी केली, अगदी वर्गात प्रथम क्रमांकही मिळवला. मात्र, दहावीत असताना त्यांना एक प्रेयसी मिळाली. ज्यामुळे त्यांच्या अभ्यासावर परिणाम झाला. त्यांचे लक्ष विचलित झाले आणि हायस्कूलचे निकाल अपेक्षेप्रमाणे लागले नाहीत. यानंतर, त्यांच्या वडिलांनी त्यांना पाटण्याला परत बोलावले. जेणेकरून ते पुन्हा अभ्यासावर लक्ष केंद्रित करू शकेल.

» प्रेमात मिळाला धोका... : बारावीनंतर आदित्य यांना इंग्रजी शिकायचे होते. पण वडिलांच्या इच्छेनुसार त्यांनी अभियांत्रिकीला प्रवेश घेतला. सुरुवातीला सर्व काही ठीक चालले होते. पण नंतर त्यांचे त्यांच्या प्रेयसीसोबत ब्रेकअप झाले. तो त्यांच्यासाठी खूप कठीण काळ होता. प्रेमात विश्वासघात झाल्यानंतर त्याने तिला सांगितले, की तो आयएएस अधिकारी होईल. त्याने स्वतःला वचन दिले आणि यूपीएससी परीक्षेची तयारी करण्याचे ध्येय ठेवले.

» दोन अपयशांनी खचले नाहीत... : 'यूपीएससी'च्या तयारीदरम्यान आदित्य यांना सलग दोन अपयशांचा सामना करावा लागला. २०२१ आणि २०२२ मध्ये परीक्षा उत्तीर्ण होऊ न शकल्याने ते खूप तणावाखाली होते. नोकरी सोडून आणि निष्ठेने तयारी करूनही यश मिळवता आले नाही.



त्यांच्या आजूबाजूचे लोक त्याला 'तू काहीही करू शकणार नाहीस' असे म्हणून हिणवू लागले. मात्र आदित्य यांनी हार मानण्यास नकार दिला आणि आपला विश्वास कायम ठेवला. यश मिळेपर्यंत प्रयत्न करत राहण्याचा त्यांनी निश्चय केला.

### सराव परीक्षा आणि शिस्तीतून यश

आदित्य यांनी आपल्या तयारीदरम्यान प्रामुख्याने स्व-अध्ययन आणि वेळेच्या व्यवस्थापनावर लक्ष केंद्रित केले. मोठ्या टेस्ट सिरीजवर अवलंबून राहण्याऐवजी त्यांनी इंटरनेटवरून साहित्य गोळा करून घरीच सराव केला. मुख्य परीक्षेसाठी दररोज उत्तर लेखनाचा सराव केला. मुलाखतींची तयारी करताना, मानसिक ताण कमी करण्यासाठी कुटुंब आणि मित्रांवर अवलंबून राहून त्यांनी मोजक्याच लोकांकडून मार्गदर्शन घेतले. UPSC २०२३ मध्ये अखिल भारतीय ४८ वा क्रमांक मिळवला. आज ते एक IAS अधिकारी आहेत.



# कॉलेज बॉय नव्हे IPS अभिजीत पाटील!

## एका युट्यूब व्हिडीओ वयाच्या 22 व्या वर्षी बदलले आयुष्य

**जर कोणाला वाटत असेल की कोचिंगशिवाय, व्यापक संसाधनांशिवाय आणि अनेक वर्षांच्या संघर्षाशिवाय तुम्ही यूपीएससी उत्तीर्ण होऊ शकत नाही. तर अभिजीत पाटील यांची यशोगाथा हा विचार बदलण्यासाठी पुरेशी आहे. वयाच्या २२ व्या वर्षी कोणत्याही कोचिंगशिवाय त्यांनी देशातील सर्वात कठीण परीक्षांपैकी एक असलेली यूपीएससी नागरी सेवा परीक्षा केवळ उत्तीर्णच केली नाही, तर चांगला रँक मिळवून ते आयपीएस अधिकारी बनले.**



» लोक समजतात कॉलेज बॉय : अभिजीत यांनी वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी कठीण यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण केली. ते सध्या राजस्थानमधील चुरू जिल्ह्यातील राजगड येथे एएसपी (ASP) म्हणून कार्यरत आहेत. राजस्थान केडरमधील सर्वात तरुण आयपीएस अधिकारी असलेल्या पाटील यांना अनेकदा कॉलेजचा मुलगा समजले जाते. पण त्यांच्या खांद्यावरील चमकणारे तारे आणि त्यांचा गणवेश त्यांची खरी ओळख उघड करतात. अतिशय लहान वयात यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण केलेले अभिजीत हजारो तरुणांसाठी प्रेरणा बनले आहेत.

» पदवी मिळवण्यापूर्वीच यूपीएससी पूर्वपरीक्षा उत्तीर्ण : अभिजीत हे अभियांत्रिकीचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांनी सिव्हिल आणि एन्व्हायर्नमेंटल इंजिनिअरिंगमध्ये बी.टेक पदवी मिळवली. त्यांच्या कथेतील एक उल्लेखनीय बाब म्हणजे, त्यांनी महाविद्यालयीन पदवी मिळवण्यापूर्वीच यूपीएससी नागरी सेवा पूर्वपरीक्षा उत्तीर्ण केली, जे त्यांच्या अपवादात्मक क्षमतेचे द्योतक आहे. हे दुर्मिळ आहे. अंतिम वर्षाचे विद्यार्थी यूपीएससी पूर्वपरीक्षेला बसू शकतात, परंतु त्यासाठी त्यांनी यूपीएससी मुख्य परीक्षेच्या अर्जाच्या अंतिम मुदतीपूर्वी आपली पदवी पूर्ण केलेली असावी आणि त्यांच्याकडे उत्तीर्णतेचे प्रमाणपत्र असावे. यूपीएससी मुख्य परीक्षेचा DAF-I अर्ज भरताना पदवीचा तपशील आवश्यक असतो.

» एका यूट्यूब व्हिडिओने आयुष्य बदलले : एका यूट्यूब व्हिडिओने अभिजीत यांचे आयुष्य बदलले. हे त्यांच्या अभियांत्रिकीच्या अभ्यासादरम्यान घडले. एका यूट्यूब व्हिडिओने त्यांना भविष्यात काय करायचे आहे हे ठरविण्यात मदत केली. एका मुलाखतीत त्यांनी सांगितले की, त्यांनी यूट्यूबवर एका यूपीएससी टॉपरचा व्हिडिओ पाहिला. ज्यामुळे त्यांना यूपीएससीची तयारी करण्याची प्रेरणा मिळाली. तिथूनच त्यांचा यूपीएससीचा प्रवास सुरू झाला आणि लवकरच ते आपल्या ध्येयापर्यंत पोहोचले.

» यूपीएससी फायनलमध्ये ४७० वा क्रमांक : शिस्त आणि वेळेच्या व्यवस्थापनामुळे अभिजीत पाटील यांना मेहनतीचे फळ मिळाले. त्यांनी UPSC नागरी सेवा परीक्षा २०२२ मध्ये OBC प्रवर्गातून ४७० वा अखिल भारतीय रँक (UPSC AIR) मिळवला. त्यांनी UPSC मुख्य परीक्षेत १७५० पैकी ७७२ आणि मुलाखतीत २७५ पैकी १८० गुण मिळवले, ज्यामुळे त्यांना २०२५ पैकी ९५२ गुण मिळाले. अभिजीत यांचा प्रवास हे सिद्ध करतो की, जर तुमच्यात दृढनिश्चय आणि कठोर परिश्रम असतील, तर तुमचे वय किंवा विपुल संसाधने महत्त्वाचे ठरत नाहीत. तुमचे वय तुमच्या यशात अडथळा ठरू शकत नाही.

### आयपीएस अभिजीत पाटील कोण आहेत?

अभिजीत तुळशीराम पाटील यांचा जन्म ११ जून १९९९ रोजी महाराष्ट्रातील ठाणे येथे झाला. त्यांचे वडील बृहन्मुंबई महानगरपालिकेचे (बीएमसी) मुख्य लेखापरीक्षक होते आणि आई सिंचन विभागात कार्यरत होत्या. आता दोघेही आपापल्या पदांवरून सेवानिवृत्त झाले आहेत. अभिजीत यांना दोन मोठ्या बहिणी आहेत. त्यांनी २०२२ मध्ये यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण केली आणि आयपीएस अधिकारी बनले.




### कोचिंगशिवाय रोज आठ तासांची तयारी

अनेकांचा असा विश्वास आहे, की यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नामांकित कोचिंग संस्थांवर लाखो रुपये खर्च करावे लागतात आणि अनेक वर्षांचा संघर्ष करावा लागतो, पण अभिजीत यांनी हा समज बदलण्यासाठी काम केले आहे. त्यांनी अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षातच यूपीएससीची तयारी सुरू केली. कोणत्याही कोचिंग किंवा विस्तृत साधनांशिवाय, त्यांनी केवळ इंटरनेट आणि पुस्तकांच्या साहाय्याने स्व-अभ्यास करून यूपीएससी परीक्षा दिली. त्यांनी ८ महिने दररोज ८ तास यूपीएससीच्या तयारीसाठी समर्पित केले.

# बिझनेस

## कमी वयात लग्न अन् दारूडा नवरा...

# कमी पैशात सुरू केला व्यवसाय, ज्याचे आज 8,300 कोटींचे साम्राज्य!



**मीरा कुलकर्णी या उत्तराखंडमधील टिहरी गढवालच्या आहेत. कठोर परिश्रम आणि प्रतिभेच्या जोरावर त्यांनी ८,३०० कोटी रुपयांचा एक आयुर्वेदिक स्किनकेअर ब्रँड उभा केला आहे. त्याचे नाव 'फॉरेस्ट इसेन्शियल्स'(Forest Essentials) आहे. मीरा यांनी ही कंपनी फक्त २ लाख रुपयांमध्ये सुरू केली. मीरा कुलकर्णी यांच्या यशाच्या प्रवासाबद्दल जाणून घेऊया...**

मीरा कुलकर्णी यांचा जन्म परंपरा आणि संस्कृतीला महत्त्व देणाऱ्या कुटुंबात झाला. सुखी आयुष्याच्या आशेने त्यांनी लहान वयातच लग्न केले. मात्र पतीला दारूचे व्यसन लागले आणि तो इतका आहारी गेला, की परिस्थिती दिवसेंदिवस बिघडत गेली. त्यांच्या पतीचा व्यवसाय डगमगू लागला. अखेरीस मीरा यांनी पतीला घटस्फोट देण्याचा आणि आपल्या मुलांना एकटीने (एकल माता म्हणून) वाढवण्याचा कठीण निर्णय घेतला. त्या दिवसांची आठवण काढताना मीरा कुलकर्णी म्हणाल्या, की 'मला माझे आयुष्य शून्यातून सुरू करावे लागले. भविष्यात काय वाढून ठेवले आहे याची मला काहीच कल्पना नव्हती.' मीरा यांच्या शिक्षणाबद्दल बोलायचे झाल्यास, त्यांनी चेन्नई येथील स्टेला मारिस कॉलेजमधून फाइन आर्ट्समध्ये पदवी घेतली. टिहरी गढवाल हे भारतातील आयुर्वेदाचे एक प्रमुख केंद्र मानले जाते आणि त्यामुळेच त्या आयुष्याच्या सुरुवातीच्या काळातच आयुर्वेदिक जीवनशैलीत जोडल्या गेल्या होत्या. आयुर्वेदातील आवडीनुसार मीरा यांनी विविध उत्पादने विकसित करण्यासाठी अनेक वर्षे वैद्य आणि आधुनिक जैव-रसायनशास्त्रज्ञांसोबत काम केले.

### 2 लाख रुपयांमध्ये कंपनीची सुरुवात...

वयाच्या ४५ व्या वर्षी मीरा यांनी आयुर्वेद आणि नैसर्गिक उपचारांवरील आपले प्रेम एका ठोस गोष्टीत बदलण्याचा निर्णय घेतला. हातात फक्त २ लाख रुपये घेऊन त्यांनी २००० साली 'फॉरेस्ट इसेन्शियल्स'ची स्थापना केली. त्यांची दृष्टी स्पष्ट होती: आयुर्वेदिक परंपरांवर आधारित, पण आधुनिक लक्झरीच्या वेष्टनात सादर केलेली त्वचेची काळजी घेणारी उत्पादने तयार करणे. मीरा यांनी स्वयंपाकघरात हाताने बनवलेल्या साबण आणि तेलांचे प्रयोग करत लहान सुरुवात केली. अस्सलपणा आणि गुणवत्तेला महत्त्व देणाऱ्या ग्राहकांमध्ये ही उत्पादने लवकरच लोकप्रिय झाली.

### मोठी संधी चालून आली...

जेव्हा 'हयात रीजन्सी हॉटेल ग्रुप'ने त्यांच्या हॉटेल्ससाठी या साबणांची मागणी केली, तेव्हा त्यांच्यासमोर एक मोठी संधी चालून आली. त्यांची अशीही अट होती की त्यांच्या खोल्यांमध्ये फक्त फॉरेस्ट एसेन्शियल्सचे साबणच उपलब्ध असावेत. हळूहळू पण सातत्याने कंपनीला मोठ्या हॉटेल समूहांकडून ऑर्डर्स मिळू लागल्या. त्यांच्या इतर उत्पादनांची विक्रीही झपाट्याने वाढू लागली. त्या लहानशा सुरुवातीपासून कंपनीची सातत्याने वाढ झाली. मीरा यांनी उत्पादनाची शुद्धता, पारंपरिक सूत्रे आणि आकर्षक सादरीकरण यावर लक्ष केंद्रित केले. यामुळे गर्दीच्या बाजारपेठेत 'फॉरेस्ट इसेन्शियल्स'च्या ब्रँडला एक वेगळी ओळख मिळाली.

### समर्पण आणि कठोर परिश्रमाचे फळ

जेव्हा आंतरराष्ट्रीय लक्झरी ब्रँड 'एस्टी लॉडर'ची नजर मीरा यांच्या कंपनीवर पडली तेव्हा समर्पण आणि कठोर परिश्रमाचे फळ मिळाले. त्यांनी मीराच्या कंपनीमध्ये अल्प हिस्सा खरेदी केला. या भागीदारीमुळे ब्रँडला जागतिक ओळख मिळाली. तसेच, यामुळे मीरा यांना त्यांच्या ब्रँडचे भारतीय स्वरूप टिकवून ठेवता आले.

### आता एक हजार कोटींचे साम्राज्य

आज, मीरा यांच्या कंपनीची संपूर्ण भारतात १३० हून अधिक दुकाने आहेत. हा ब्रँड आपली उत्पादने १२० हून अधिक देशांमध्ये निर्यात करतो. त्यांच्या उत्पादन श्रेणींमध्ये त्वचेची काळजी, केसांची काळजी, शरीराची काळजी आणि वेलनेस उत्पादने यांचा समावेश आहे, जी सर्व आयुर्वेदिक तत्त्वांवर आधारित आहेत. या ब्रँडचा वार्षिक महसूल अंदाजे ४३२ कोटी रुपये आहे. त्याचे मूल्यांकन वाढून ८,३०० कोटी झाले आहे. मीरा भारतातील सर्वात श्रीमंत महिला उद्योजकांपैकी एक बनल्या आहेत. फॉरेस्ट एसेन्शियल्स हे भारतातील अनेक मोठ्या आणि आलिशान हॉटेल समूहांना, ज्यात प्रसिद्ध ताज ग्रुप ऑफ हॉटेल्स आणि द ओबेरॉय हॉटेल्स यांचा समावेश आहे, एक प्रमुख पुरवठादार आहे.

### मीरा यांची निव्वळ संपत्ती

मीरा कुलकर्णी यांची वैयक्तिक निव्वळ संपत्ती अंदाजे १,२९० कोटी रुपये असल्याचा अंदाज आहे. आकड्यांच्या पलीकडे, त्यांचा खरा वारसा भारतातील सौंदर्याचे मापदंड पुन्हा परिभाषित करण्यात आहे. त्यांनी हे सिद्ध केले की, जेव्हा प्रामाणिकपणा आणि नावीन्यपूर्णतेने सादर केले जाते, तेव्हा आपल्या आयुर्वेदासारख्या पारंपरिक ज्ञान प्रणाली जागतिक ब्रँड्सशी स्पर्धा करू शकतात आणि त्यांना मागेही टाकू शकतात.



# 1413 कोटींची संपत्ती; डीके शिवकुमार ठरले सर्वात श्रीमंत मुख्यमंत्री!



डी. के. शिवकुमार यांची कर्नाटकातील काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून निवड झाली असून, ३ जून रोजी ते राज्याचे २५ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील. ६४ वर्षीय शिवकुमार हे देशातील सर्वात श्रीमंत मुख्यमंत्री असतील. त्यांची एकूण घोषित संपत्ती १,४१३ कोटी रुपये आहे. आंध्र प्रदेशचे चंद्रबाबू नायडू (९३१ कोटी रुपये) दुसऱ्या क्रमांकावर, तर तामिळनाडूचे सी. जोसेफ विजय (६५८ कोटी रुपये) तिसऱ्या क्रमांकावर आहेत. याचा अर्थ, देशातील तीन सर्वात श्रीमंत मुख्यमंत्री दक्षिणेकडील आहेत.

असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्सने (ADR) निवडणूक प्रतिज्ञापत्रांच्या आधारे हे विश्लेषण केले आहे. या विश्लेषणानुसार, अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री पेमा खांडू ३३२ कोटी रुपयांच्या घोषित संपत्तीसह या यादीत चौथ्या क्रमांकावर आहेत. दुसरीकडे, देशातील सर्वात गरीब मुख्यमंत्री जम्मू आणि काश्मीर या केंद्रशासित प्रदेशाचे ओमर अब्दुल्ला आहेत. त्यांची एकूण घोषित मालमत्ता फक्त ५५ लाख रुपये आहे. राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा आणि ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण मांझी यांनी प्रत्येकी १ कोटी रुपयांची मालमत्ता घोषित केली आहे.

### संपत्ती कशी वाढली?

बहुतेक राजकारणी सार्वजनिक जीवनात सामान्यतः कमी प्रसिद्धीची प्रतिमा जपतात, परंतु शिवकुमार यांची प्रतिमा वेगळी आहे. त्यांना Louis Vuitton, Chanel, Prada, Burberry आणि Gucci यांसारख्या आलिशान ब्रँड्सची आवड आहे. त्यांच्याकडे Rolex आणि Cartier ची महागडी घड्याळेही आहेत. शिवकुमार यांची एकूण स्थावर मालमत्ता १,१४० कोटी आणि जंगम मालमत्ता २७३ कोटींची आहे. त्यांच्यावर २६५ कोटींचे कर्जही आहे. २००८ मध्ये, त्यांनी आपली एकूण मालमत्ता ७५.५ कोटी रुपये असल्याचे जाहीर केले होते, जी २०१३ मध्ये २५१ कोटी, २०१८ मध्ये ८४० कोटी आणि २०२३ मध्ये १,४१३ कोटींपर्यंत वाढली. त्यांची बहुतेक संपत्ती वडिलोपार्जित जमीन आणि गुंतवणुकीतून आलेली आहे. बंगळूर, म्हैसूर, कनकपुरा आणि दिल्ली येथे त्यांच्या निवासी मालमत्ता आहेत. बंगळूरुच्या गोपाळपुरा येथे त्यांचा एक मॉलही आहे. गेल्या दोन दशकांत कर्नाटकात जमिनीच्या किमती लक्षणीयरीत्या वाढल्या आहेत, ज्यामुळे शिवकुमार यांना मोठा फायदा झाला आहे.

# मनोज जरांगेंचं उपोषण मागे, सरकारकडून मागण्या मान्य



**मुंबई (प्रतिनिधी)** –जालन्यातील अंतरवाली सराटीत मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू केलेलं उपोषण मनोज जरांगे पाटील यांनी अखेर मागे घेतलं आहे. काल रात्री मराठा आरक्षण अभ्यासक आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यात सकारात्मक चर्चा झाली. अभ्यासकांच्या सूचवलेल्या दुरुस्त्या सरकारनं मान्य केल्यानंतर मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजपचे आमदार प्रसाद लाड यांनी रात्री साडेदहा वाजता जरांगे पाटलांची भेट घेतली. सकारात्मक चर्चेनंतर मनोज जरांगेंनी मध्यरात्री १.१५ वाजता पाणी पिऊन उपोषण मागे घेतलं.

शासन निर्णय काढण्यासाठी मनोज जरांगेंनी सरकारला मंगळवारपर्यंतची मुदत दिली आहे. तसंच शासन निर्णय न दिल्यास पुन्हा उपोषणाला बसण्याचा इशाराही मनोज जरांगेंनी दिला. आमच्या मागण्यांवर सरकारने दिलेल्या ड्राफ्टवरून मंगळवारपर्यंत (२ जून) आदेश काढायचे सरकारने तयारी दाखवल्याने उपोषण स्थगित केलं आहे, अशी घोषणा मनोज जरांगेंनी केली. तसेच सातारा गॅझेटीयर साठी सरकारला एक महिना वेळ द्यायला हरकत नाही. पण तोपर्यंत कुणबी प्रमाणपत्र काढण्यात येतील, अशी माहितीही मनोज जरांगेंनी दिली. आता जर थांबले तर आम्ही या दोघांना (राधाकृष्णा विखे पाटील– प्रसाद लाड) जबाबदार धरणार, असा इशाराही मनोज जरांगेंनी यावेळी दिला.

### जरांगेंच्या मागण्यांवर काय तोडगा?

५८ लाख नोंदींचे दस्तावेज जरांगेंना दिले जाणार, नोंदी सापडलेल्यांना कुणबी प्रमाणपत्रे देणार, जात पडताळणीसाठी विभागीय आयुक्त १५ दिवसांत बैठक घेणार, सातारा गॅझेटसाठी सरकारला आणखी एक महिना वेळ, न्या. शिंदे समितीला एक वर्षांची मुदतवाढ, प्रमाणपत्र वैधतेसाठी सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात हेल्पलाईन, आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष विखे-पाटलांचीही स्वतंत्र हेल्पलाईन, मंत्रालयात मराठा आरक्षण कक्ष स्थापन होणार.

### जरांगेंच्या उपोषणावर देवेंद्र फडणवीसांची प्रतिक्रिया

सरकार मराठा आरक्षणाबाबत सकारात्मक आहे. सरकारची भूमिका पारदर्शक आहे. आम्ही सकारात्मक काम करणारे लोक आहोत. आम्ही समाजांना एकमेकांसमोर आणून भांडत नाही, असं देवेंद्र फडणवीसांनी सांगितले. तसेच आम्ही समाजाच्या हिताचे निर्णय घेतो. परंतु त्याचवेळी संविधान आणि न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून निर्णय घेतो, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. आम्ही एका समाजाचे आरक्षण काढून दुसऱ्या समाजाला देत नाही. ओबीसी समाजावर कोणताही अन्याय होऊ देणार नाही, त्यांनी घाबरायचे कारण नाही. न्यायालयाच्या चौकटीत बसून निर्णय घेणार आहोत, असे देवेंद्र फडणवीसांनी स्पष्ट केलं.

# नांदेडमधून अमर राजूरकर यांना भाजपची उमेदवारी जाहीर



**मुंबई/नांदेड (प्रतिनिधी) – भारतीय जनता पार्टीच्या केंद्रीय निवडणूक समितीने महाराष्ट्र विधान परिषद द्विवार्षिक व एका पोटनिवडणुकीसाठी आपल्या उमेदवारांची अधिकृत घोषणा रविवारी केली आहे. नांदेडमधून भाजपाचे महानगराध्यक्ष अमर राजूरकर यांच्यासह राज्यातील ११ उमेदवारांची घोषणा केली आहे.**

राज्यात विधानपरिषदेच्या एकूण १७ जागा रिक्त झाल्या आहेत. त्यातील एका जागेवर पोटनिवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी भाजपमधील अनेक इच्छुकांनी जोरदार कंबर कसली होती. इच्छुकांनी उमेदवारीसाठी भाजपच्या वरिष्ठांच्या भेटी घेतल्या होत्या. यामुळे विधानपरिषदेच्या निवडणुकीत उमेदवारीसाठी चुरस वाढली होती.

भाजपकडून विधानपरिषदेच्या उमेदवारांच्या नावाची घोषणा थेट दिल्लीतून झाली. उमेदवारांच्या नावाची यादी निश्चित करण्यासाठी अनेक बैठका झाल्या. खरंतर राज्यात झालेल्या बैठकीत ४८ जणांची नावे निश्चित करण्यात आली होती. त्यानंतर नावांची यादी भाजपच्या अध्यक्षांकडे सोपवण्यात आली. त्यानंतर भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची बैठक झाली. या बैठकीनंतर विधानपरिषदेच्या उमेदवारांच्या नावांची यादी जाहीर करण्यात आली.

**उमेदवारांची नावे–** सोलापूर – राजेंद्र राऊत, अहिल्यानगर – प्राजक्त तनपुरे, छत्रपती संभाजीनगर-जालना – सुहास शिरसाट, नांदेड – अमर राजूरकर, धाराशिव-लातूर-बीड – बसवराज पाटील, भंडारा-गोंदिया-अविनाश ब्राह्मणकर, अमरावती – प्रवीण पोटे पाटील, सांगली-सातारा – धैर्यशील कदम, जळगाव – नंदकिशोर महाजन, नागपूर – डॉ. राजीव पोतदार, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली –अरुण लखानी तर ठाणे विधानपरिषदेकरिता शिवसेनेकडून रवींद्र फाटक यांना पुन्हा संधी देण्यात आली आहे.

# जीम बॉडी बनवणारे १५० 'टर्मिन' इंजेक्शन्स जप्त; बुलेटसह दोन आरोपीही ताब्यात

**सोलापूर(प्रतिनिधी)–** सध्या तरुणाईमध्ये जीम (सू) बॉडी बनवून आपले देहप्रदर्शन करणे किंवा आपल्या प्रतिमा निर्माण करण्याचा नवा ट्रेंड पाहायला मिळत आहे. त्यातूनच, अनेक तरुण जीममध्ये जाऊन घामही गाळतात आणि प्रोटीन किंवा इंजेक्शनचे डोस घेऊन शरीरयष्टी पिळदार करण्यासाठी धडपड करतात. मात्र, काहीवेळा अतिरिक्त प्रोटीन किंवा इजेक्शनचा डोस तरुणांच्या जीवावर बेतू शकतो. कारण, हे इंजेक्शन डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय घेतल्यास घातकही ठरू शकतात. जिल्ह्यातील (डेश्ररीीी) करमाळा पोलिसांनी (झेश्रळलश) अशीच एक कारवाई केली असून दोन आरोपींसह जीम बॉडीसाठी देण्यात येणारी टर्मिन इंजेक्शन जप्त केली आहेत. दुचाकीसह एकूण २ लाख ९ हजार रुपयांच्या मुद्देमालासह दोघांना अटक करण्यात आली आहे.

आपली शारीरिक क्षमता वाढवण्यासाठी आणि तात्पुरती चांगली शरीरयष्टी बनवण्यासाठी जिममध्ये जाणाऱ्या तरुणांना आकर्षित करणाऱ्या टर्मिन इंजेक्शन्सची बेकायदेशीर विक्री करणाऱ्या दोन इसमांना करमाळा पोलिसांनी रंगेहात पकडले आहे. पोलिसांच्या या धडक कारवाईत 'मेफेनटरमाइन सल्फेट या घातक इंजेक्शन्सच्या एकूण १५० बाटल्या आणि गुन्ह्यात वापरलेली बुलेट मोटारसायकल असा एकूण २ लाख ९ हजार १३३ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# विधान परिषदेसाठी महायुतीचे अंतिम जागावाटप निश्चित

■ नांदेडसह ११ जागा भाजपकडे, पुणे, कोकण राष्ट्रवादीला, ठाणे, नाशिक शिवसेनेला



**मुंबई(प्रतिनिधी)–**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषद निवडणुकीसाठी अखेर महायुतीचे अंतिम जागावाटप निश्चित झाले आहे. प्रचंड रस्सीखेच आणि जागांवरील दावे-प्रतिदाव्यांनंतर १७ जागांसाठी तिन्ही पक्षांमध्ये एकमत झाले आहे. अंतिम फॉर्म्युलानुसार भाजप ११, शिवसेना ४ तर राष्ट्रवादी २ जागांवर निवडणूक लढवणार आहेत. प्रदेश आणि केंद्रातील नेत्यांच्या चर्चेनंतर जागांवर शिक्कामोर्तब करण्यात आलं आहे. अतिरिक्त एक जागा पदारात पाडून घेण्यात राष्ट्रवादीला यशस्वी झाली. तर ७ जागांवर अडून बसलेल्या शिवसेनेला ४ जागांवर समाधान मानावे लागणार आहे.

**महायुतीचे अंतिम जागावाटप**

भाजप -११, शिवसेना-४, राष्ट्रवादी काँग्रेस -२.

**भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, कोणाला कोणती जागा?**

**भाजप–** सोलापूर, जळगाव, भंडारा-गोंदिया, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, अमरावती, धाराशिव, लातूर, बीड, नागपूर, छ. संभाजीनगर, जालना, अहिल्यानगर, सांगली, सातारा, नांदेड.

**शिवसेना–** ठाणे, नाशिक, परभणी, यवतमाळ.

**राष्ट्रवादी काँग्रेस–**कोकण, पुणे.

**विधान परिषदेच्या १७ जागांसाठी निवडणुका**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाच राज्यात न झाल्याने या मतदारसंघामध्ये पूर्वी निवडून आलेल्या आमदारांचा कार्यकाळ संपुष्टात येऊनही निवडणूक होऊ शकली नाही. अशात, गेल्या दोन अडीच वर्षांपासून आमदारकीच्या जागा रिक्त आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील एकूण मतदार संख्येच्या ७५ टक्के मतदार संख्या असेल तर विधान परिषदेची निवडणूक घेता येते. विधान परिषदेच्या एकूण ७८ सदस्य संख्येपैकी २२ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे निवडून जात असतात. सोलापूर, अहमदनगर, ठाणे, जळगाव, नांदेड, सांगली-सातारा, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, नाशिक, अमरावतीच्या स्थानिक संस्थेच्या विधान परिषदेच्या जागांसाठी निवडणूक होणार आहे.

# ज्येष्ठ गायिका सुमन कल्याणपूर यांचे निधन

**मुंबई(प्रतिनिधी)–** संगीत जगतातून अत्यंत दुःखाची आणि मनाला चटका लावणारी बातमी समोर आली आहे. आपल्या मधुर आणि सुश्राव्य आवाजानं रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ गायिका सुमन कल्याणपूर यांचं निधन झालं आहे. वयाच्या ८९ व्या वर्षी मुंबईतील राहत्या घरी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनानं भारतीय संगीत क्षेत्रातील एका सुवर्ण युगाचा अंत झाला असून संगीत विश्वावर शोककळा पसरली आहे. मराठी भावगीत, भक्तीगीत आणि हिंदी चित्रपट संगीतात त्यांनी दिलेले योगदान कधीही न विसरता येणारं आहे. कला क्षेत्रातील त्यांच्या अफाट कामगिरीची दखल घेऊन केंद्र सरकारने २०२३ साली त्यांना 'पद्मभूषण' या नागरी पुरस्काराने सन्मानित केलं होतं.

# मुसळधार पावसामुळे केदारनाथ यात्रेला ब्रेक!

**डेहराडून (वृत्तसंस्था) –** उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत होण्यास सुरुवात झाली असून, यात्रेकरूंच्या सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाने केदारनाथ यात्रा तात्पुरती स्थगित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. हवामान विभागाने राज्यातील अनेक भागांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला असून, पुढील काही तासांत जोरदार पाऊस, वादळी वारे आणि भूस्खलनाचा धोका वाढण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

शनिवारी रात्रीपासून डेहराडून, रुद्रप्रयाग, चमोली, उत्तरकाशी आणि गढवाल विभागातील विविध भागांत मुसळधार पाऊस कोसळत आहे. यामुळे पर्वतीय भागांतील रस्ते घसरडे झाले असून, काही ठिकाणी भूस्खलनाच्या घटनाही घडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने कोणताही धोका पत्करू नये म्हणून केदारनाथकडे जाणाऱ्या यात्रेकरूंना पुढे जाण्यास मनाई केली आहे.

**यात्रेकरूंना सुरक्षित ठिकाणी थांबण्याचे आदेश**

रुद्रप्रयाग जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांच्या निर्देशानुसार, केदारनाथ ट्रेक मार्गावर असलेल्या सर्व यात्रेकरूंना जवळच्या होल्डिंग पॉइंट्स आणि सुरक्षित निवारा केंद्रांमध्ये थांबविण्यात आले आहे. हवामान अनुकूल होईपर्यंत कोणालाही पुढील प्रवास करण्याची परवानगी दिली जाणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# शिर्डीत साईबाबांच्या चरणी २४ लाखांचा हार दान

**शिर्डी (प्रतिनिधी)–** भारतातील सर्वात श्रीमंत मंदिरांमध्ये ज्या शिर्डीचा समावेश होतो त्या साईबाबांच्या मंदिरात एका भाविकाने अतिशय मौल्यवान वस्तूचे दान केले आहे. श्रद्धा म्हणून या भाविकाने साईबाबांच्या चरणी लाखो रुपये किंमतीचा अतिशय मौल्यवान आणि सुंदर असा हार दान केला आहे. हार दान करणाऱ्याने त्याचे नाव गुप्त ठेवण्याची विनंती मंदिर प्रशासनाला केली आहे. भाविकाच्या विनंतीला मान देत मंदिर प्रशासनाने दानशूर व्यक्तीचे नाव गुप्त ठेवले आहे. पण साईबाबांच्या



आरतीवेळी दररोज करण्यात येणाऱ्या श्रृंगारादरम्यान भाविकाने दान केलेला सुवर्ण रत्नजडीत ब्रोच साईबाबांना परिधान करण्यात येणार आहे.

साईचरणी दान करणाऱ्या भाविकाने केवळ सुवर्ण हार नव्हे तर साई संस्थानला नऊ लाख रुपयांचे रोख दान देखील दिले आहे. मात्र एवढे मोठे दान करूनही संबंधित भाविकाने आपली ओळख गुप्त ठेवण्याचा निर्णय घेतला असून, नाव जाहीर न करण्याची विनंती केली आहे. श्रद्धा, भक्ती आणि साईबाबांप्रती असलेली निस्सीम आस्था यामुळेच शिर्डीच्या साईदरबारात आजही अशा दानशूर भक्तांची संख्या मोठी असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# भीमाशंकर मंदिर १५ जूनपासून दर्शनासाठी खुले; ऑनलाईन पास अनिवार्य

**पुणे(प्रतिनिधी) –** बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर भाविकांसाठी पुन्हा खुले होणार आहे. गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या नूतनीकरण आणि विकासकामांनंतर मंदिर प्रशासनाने १५ जून २०२६ पासून नियमित दर्शन पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सन २०२७ मध्ये होणाऱ्या नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभ-मेळ्याच्या तयारीचा भाग म्हणून भीमाशंकर परिसरात विविध विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. मंदिराच्या मुख्य सभामंडपासह पायरीमार्गाचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले असून भाविकांच्या सोयीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यात येत आहेत. याच कारणास्तव मंदिर प्रशासनाने ९ जानेवारी २०२६ पासून दर्शनासाठी मंदिर तात्पुरते बंद ठेवले होते. नंतर या बंदीची मुदत ३१ मे २०२६ पर्यंत वाढवण्यात आली होती.

# अकरावी प्रवेशासाठी गुणपत्रक व शाळा सोडल्याचा दाखला सादर करण्यास मुदत

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत सहभागी विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या निर्देशानुसार शालेय शिक्षण विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांना अद्याप मूळ गुणपत्रक व शाळा सोडल्याचा दाखला प्राप्त झालेला नसल्याने अकरावी प्रवेश प्रक्रियेत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी प्रवेश निश्चित करताना ही कागदपत्रे तात्काळ सादर करण्याची सक्ती न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) डॉ.महेश पालकर यांनी याबाबत सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) आणि कनिष्ठ महाविद्यालयांना सूचना जारी केल्या आहेत.

सन २०२६-२७ च्या अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेअंतर्गत नियमित फेरी क्रमांक १ सुरू असून २९ मे २०२६ रोजी गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश निश्चित करताना मूळ गुणपत्रक आणि शाळा सोडल्याचा दाखला अनिवार्यपणे सादर करण्याची अट तात्पुरती शिथिल करण्यात आली आहे.


नमुना ई - ४ (नियम १८ पहा)

रासनिआ/कक्ष-अ-ब वर्ग/नि.का.मंजुरी 9329 /सन २०२६ दि.20/05/2026

निवडणुक निर्णय अधिकारी :- एम.एल. चौधरी, पदनाम:- सहाय्यक निबंधक, सहकारी सस्था ता.नायगाव जि. नांदेड.
सहकारी संस्थेचे नांव :- राजेमहेंद्र औद्योगिक मागासवर्गीय सहकारी संस्था म. सोमठाणा ता. नायगाव (खै.) जि. नांदेड

(अंतिम मतदार यादी प्रसिध्दी दि. १९/०५/२०२६)

महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम २०१४ च्या नियम १८ प्रमाणे अधिकारांचा वापर करुन आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण व जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी जाहीर केलेल्या उपरोक्त सहकारी संस्थेच्या सन २०२६ ते २०३१ या कालावधीसाठीचा निवडणूक कार्यक्रम मी **एम.एल. चौधरी, निवडणूक निर्णय अधिकारी, राजेमहेंद्र औद्योगिक मागासवर्गीय सहकारी संस्था म. सोमठाणा ता. नायगाव (खै.) जि. नांदेड तथा सहाय्यक निबंधक, सहकारी सस्था ता.नायगाव जि. नांदेड,** मा. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी आणि मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पूर्व मान्यतेने जाहीर करीत आहे. सदर कार्यक्रमातील विविध टप्पे, संबंधीत संस्थेचा मतदारसंघ अथवा मतदार संघानुसार खालील अनुसूचीप्रमाणे जाहीर करीत आहे.

अनुसूची

| अ. क्र. | मतदार संघाचे नांव | | नामनिर्देशनपत्रे दाखल करण्यासाठीचा शेवटचा दिनांक (ज्या जागी नामनिर्देशनपत्रे मिळतील ती जागा) | प्राप्त नामनिर्देशन पत्रांची यादी प्रसिध्द करणे | नामनिर्देशन पत्रांच्या छाननीचा दिनांक | विधीग्राहय नामनिर्देशन पत्राची सूची प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवाराने नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक | नामनिर्देशन पत्रांची चिन्हासह अंतिम यादी प्रसिध्द करणे | मतदान ज्या दिनांकास घेण्यात येईल तो दिनांक, वेळ व मतदानाचे स्थळ | मतमोजणीची दिनांक, वेळ व स्थळ | मतदानाचे निकाल घोषीत करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | १. सर्वसाधारण प्रतिनिधी | ८ | दि. ०१/०६/२०२६ ते ०५/०६/२०२६ स. ११.०० ते दु. ३.०० वाजेपर्यंत (सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता.नायगाव (खै.) जि.नांदेड यांचे कार्यालय, दत्तनगर, नायगाव) | दि. ०१/०६/२०२६ ते ०५/०६/२०२६ जसे प्राप्त होतील त्याप्रमाणे रोज सायं. ४.०० वा. (सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता.नायगाव (खै.) जि.नांदेड यांचे कार्यालय, दत्तनगर, नायगाव) | दि. ०८/०६/२०२६ सकाळी ११.३० पासून छाननी संपेपर्यंत (सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता.नायगाव (खै.) जि.नांदेड यांचे कार्यालय, दत्तनगर, नायगाव) | दि. ०९/०६/२०२६ सकाळी ११.३० वाजता (सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता.नायगाव (खै.) जि.नांदेड यांचे कार्यालय, दत्तनगर, नायगाव) | दि. ०९/०६/२०२६ ते २३/०६/२०२६ स. ११.०० ते दु. ३.०० वाजे पर्यंत (सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता.नायगाव (खै.) जि.नांदेड यांचे कार्यालय, दत्तनगर, नायगाव) | दि.२४/०६/२०२६ सकाळी ११.३० (सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता.नायगाव (खै.) जि.नांदेड यांचे कार्यालय, दत्तनगर, नायगाव) | दि. ०४/०७/२०२६ स. ८.०० ते सांय. ३.०० वाजेपर्यंत मतदानाचे ठिकाण (सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता.नायगाव (खै.) जि.नांदेड यांचे कार्यालय, दत्तनगर, नायगाव) | दि. ०४/०७/२०२६ सायं. ४.०० पासून मतमोजणी संपेपर्यन्त ठिकाण (सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता.नायगाव (खै.) जि.नांदेड यांचे कार्यालय, दत्तनगर, नायगाव) | दि. ०४/०७/२०२६ मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर लगेचच (सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता.नायगाव (खै.) जि.नांदेड यांचे कार्यालय, दत्तनगर, नायगाव) |
| | २. अनुसुचीत जाती/जमाती प्रतिनिधी | १ | | | | | | | | | |
| | ३. महिला राखीव प्रतिनिधी | २ | | | | | | | | | |
| | ४. इतर मागास प्रवर्ग मतदार संघ | १ | | | | | | | | | |
| | ५. भटक्या विमुक्त जाती / जमाती / विमाप्र | १ | | | | | | | | | |
| | एकूण | १३ | | | | | | | | | |

टिप – १) स्तंभ क्रं. ६ व ८ मध्ये विनिर्दिष्ट केलेली यादी निर्वाचन अधिकारी यांच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द केली जाईल. २) संस्थेची मतदार यादी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयामध्ये विकत मिळेल. ३) निवडणूक कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेल्या चिन्हांच्या यादीमधून चिन्हे निवडावयाचे आहे. ४) निवडणूक चिन्हाचे वाटप स्तंभ ८ मधील तारखेस व ठिकाणी सकाळी ११.३० वाजता करणेत येईल. ५) नामनिर्देशन पत्राची छाननी केल्यानंतर त्यांची प्रसिध्दी, मतदान व मतमोजणी दिवस वगळुन निवडणुक कार्यक्रम शासकीय / सार्वजनिक सुटयांखेरीज सुरु राहील. ६) निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय पत्ता : (सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता.नायगाव (खै.) जि.नांदेड यांचे कार्यालय, दत्तनगर, नायगाव)

(एम.एल. चौधरी)
निवडणुक निर्णय अधिकारी
राजेमहेंद्र औद्योगिक मागासवर्गीय सहकारी संस्था
म. सोमठाणा ता. नायगाव (खै.) जि. नांदेड

(शाहूराज हिरे)
जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी नांदेड तथा
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नांदेड.

(अशोक गाडे)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे.


# जाहीर प्रगटन

तालुका कार्यकारी दंडाधिकारी मुखेड यांचे न्यायालयात

ज्याअर्थी अर्जदार मिसाळे उदयकुमार लक्ष्मणराव रा. मुखेड ता. मुखेड यांनी त्यांच्या आईच्या मृत्यूची दिनांक ७/१०/२०२० मौ. मुखेड ता. मुखेड, जि. नांदेड येथे जन्म झाला असून, सदर जन्म नोंद नोंदणी सुधारणा कायदा २०२४ च्या कलम ११(३) व (३) अन्वये घेण्याकरिता निबंधक जन्म, मृत्यू निबंधक नगर परिषद मुखेड ता. मुखेड यांना आदेशीत करण्यासाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी, मिसाळे गंगाबाई लक्ष्मणराव रा. मुखेड ता. मुखेड त्यांनी मृत्यूची दिनांक ७/१०/२०२० मौ. मुखेड ता. मुखेड, जि. नांदेड येथे उपलब्ध नाही. त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार मिसाळे गंगाबाई लक्ष्मणराव रा. मुखेड, ता. मुखेड यांनी मृत्यूची दिनांक ७/१०/२०२० मौ. मुखेड ता. मुखेड, जि. नांदेड रोजी नोंद घेण्याविषयी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसामध्ये संबंधित मंडळ अधिकारी अथवा या कार्यालयात हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहित मुदतीत हजर राहून आक्षेप किंवा उजर दाखल न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

तालुका दंडाधिकारी, मुखेड


कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



# बँक कर्मचाऱ्यानेच मारला बँकेतील सोन्यावर डल्ला

- ठेवीदाराचे खरे सोने चोरून बनावट सोने ठेवले
- पोलिसांनी केली कर्मचाऱ्यास अटक

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या डॉक्टर लेन परिसरातील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेत ठेवीदाराने ठेवलेल्या सोन्यावरच बँकेतील कॅशियर आणि सर्विस मॅनेजरने डल्ला मारला. या दोघांनी संगनमत करून लॉकरमध्ये ठेवलेले ३९१ ग्राम सोने चोरून त्या ठिकाणी बनावट ४१४ ग्रॅम सोने ठेवले. अशा प्रकारे ८०५.९० ग्रॅम सोने (८५ लाख ८१ हजार ५९७) रुपयांची फसवणूक केली.

याप्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होताच पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम व त्यांच्या पथकाने एकाला ताब्यात घेतले आहे. आरोपी जगदाळे याला चार दिवसांची पोलीस कोठडी मिळाली.

शहराच्या डॉक्टर लेन परिसरात असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेत ८ ठेवीदारांनी लोन घेण्यासाठी ठेवलेले तारण सोने (३९१ ग्राम सोने) स्वतः च्या फायद्यासाठी काढून घेऊन त्या ठिकाणी ४१४ ग्रॅम बनावट सोने हे ठेवून असे ८५ लाख ८१ हजार ५९७ रुपयाचे बँकेची आणि ग्राहकांची फसवणूक केली. हा प्रकार ३० मे रोजी उघडकीस आल्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडिया डॉक्टर लेन शाखेचे मुख्य व्यवस्थापक राजीव कदम यांच्या फिर्यादीवरून वजिराबाद पोलीस ठाण्यात आरोपी याच बँकेतील कॅश इन्चार्ज आदित्य प्रकाश सेनगावकर आणि सर्विस मॅनेजर जीवन माधवराव जगदाळे या दोघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार १८ मे २०२६ पूर्वी घडला होता. पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत आरोपी जीवन जगदाळे याला ताब्यात घेतले आहे. या प्रकरणामुळे ठेविदार ग्राहकांमध्ये खळबळ उडाली आहे.




**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
**सेवा क्लिनीक**
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308




